40



Exh.24

रे.क.नं. १६४/२०२५

# मा. दिवाणी न्यायाधिशसो कनिष्ठ स्तर, कागल
# यांचे न्यायालयात ....

Order
R and R
C.J.J.D.Kagal

राजश्री मंगेश रेवडे ——— वादी

विरुध्द

१५. रेणुका विकास मगदूम ——— प्रतिवादी

यातील प्रतिवादी नं. १५ तर्फे वादीच्या दावेस व तुर्तातुर्त मनाई अर्जास कैफियत व म्हणणे पुढीलप्रमाणे :—

१. वादीचा दावा हा साफ खोटा, चुकीचा, लबाडीचा, साधनिभूत व बेकायदेशीर असून प्रतिवादीला बिलकुल मान्य व कबुल नाही. दाव्यातील कथने मे. कोर्टाची दिशाभुल करणारी अशी आहे.

२. दावा मिळकतीचे वर्णन खरे व बरोबर नाही.

३. दावा अर्जी कलम २ मधील मजकुर सर्व साधारणपणे बरोबर आहे.

४. दावा अर्जी कलम ३ मधील वरून ८ व्या ओळीत फक्त रेणुका विकास मगदूम यांनी दावा मिळकतीमधील हे. ०.०६ आर इतकी मिळकत रजिस्टर दस्त नं. ६८४/२०१८ ने खरेदी केली इतकाच मजकुर बरोबर आहे. या खरेदीपत्रास वादी नं. १ चे पती व वादी नं. २ चे वडील यांनी मान्यता दिलेली आहे. ही कायदयाची बाजु वादीने मे. कोर्टापासून लपवून ठेवलेली आहे.

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2025.12.22 16:33:16 +0530

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

५. दावा अर्जी कलम ४ मध्ये प्रतिवादी नं. १५ बद्दल **'ब्र'** देखील काढलेला नाही. अशापरिस्थितीत प्रतिवादी नं. १५ ही त्यावर काहीही भाष्य (No Comments) करू इच्छित नाहीत.

६. दावा अर्जी कलम ५ मधील संपुर्ण मजकुर साफ खोटा, चुकीचा, लबाडीचा असून प्रस्तुत प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाही. दावा मिळकतीशी प्रतिवादी नं. १५ यांचा काहीही संबंध नाही. प्रतिवादी नं. १५ चे ता. १२/०४/२०१८ इ.रोजी खरेदी केलेली हे ०.०६ आर क्षेत्र यासी चतु:सिमा:—

पुर्वेस — रस्ता

पश्चिमेस — गट नं. ११३० ची मिळकत

दक्षिणेस — याच गटातील कमुरूद्दीन मुजावर यांची मिळकत

उत्तरेस — याच गटातील तात्यासाो पाटील यांची मिळकत

असे असून प्रतिवादी नं. १५ ने उपरोक्त खरेदी केलेल्या मिळकतीला तात्यासाहेब सुरगोंडा पाटील व श्री. मंगेश कृष्णात रेवडे यांनी मान्यता दिलेली आहे व खरेदी नंतर उपरोक्त क्षेत्रात प्रतिवादी नं. १५ ची शांततायम कब्जेवहिवाट आहे. प्रतिवादी नं. १५ हिने त्यांनी खरेदी घेतलेल्या क्षेत्रास तारेचे कंपाऊंड केलेले आहे. अशा परिस्थितीत वादींना प्रतिवादी नं. १५ विरूध्द दाद मागणेचा कोणताही हक्क नाही.

७. दावा अर्जी कलम ६ मधील मजकुर प्रतिवादी नं. १५ ला मान्य व कबुल नाही. दावा अर्जी कलम ६ मध्ये वादीने प्रतिवादी

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

नं. १५ विरूध्द 'ब्र' देखील काढलेला नाही. परिणामी प्रतिवादी नं.१५ त्यावर काहीही भाष्य (No Comments) करू इच्छित नाहीत. तसेच, गट नं. ११२९ मध्ये काही लोकांनी बंगले देखील बांधले आहेत. ही वस्तुस्थिती मे. कोर्टापासून लपवून ठेवलेली आहे. परिणामी, वादींना मनाईसारखी दाद स्पेसिफिक रिलीफ अॅक्ट, १९६३ च्या तरतुदीनुसार देता येणार नाही.

८. दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही जे घडलेचे म्हणून नमुद केलेले आहे ते चुकीचे व विपर्यस्त असे आहे.

९. दाव्याचा तपशिल चुकीचा आहे.

१०. दाव्याची आकारणी चुकीची आहे.

११. सकृत दर्शनी केस प्रतिवादी नं. १५ च्या बाजुने आहे.

१२. सोईचे समतोलत्व प्रतिवादी नं. १५ च्या बाजुने आहे.

१३. वादीचा तुर्तातुत मनाई अर्ज मंजूर केलेस प्रतिवादी यांचे कधीही भरून येणार नाही असे नुकसान होणार आहे. उलटपक्षी वादीचा तुर्तातुर्त मनाई अर्ज **'नामंजूर'** केलेस त्याचे काहीही नुकसान होणार नाही.

**१४. <u>सबब प्रतिवादी नं. १५ यांची विनंती की,</u>**

अ. वादीचा दावा खर्चासह **नामंजूर** व्हावा.

ब) वादीचा तुर्तातुर्त मनाई अर्ज **नामंजूर** व्हावा.

क) जरूर तर कैफियत व म्हणणे दुरूस्तीस परवानगी असावी.

ड) या दाव्याचा कोर्ट खर्च प्रतिवादींना वादींकडून देववावा.

Assit. Supdt.
... Dn. Kagal

इ) न्यायाचे इतर हुकूम याच कामी व्हावेत.

येणेप्रमाणे कैफियत व म्हणणे असे,

**कागल**

ता.११/१२/२०२५

R.V.Magdum

**प्रतिवादी नं. १५**

## प्रतिज्ञा

मी यातील प्रतिवादी नं. १५ रेणुका विकास मगदूम, व.व. ५८, रा. घरकाम व शेती, रा. प्लॉट नं. ३०, बी वॉर्ड, आयसोलेशन हॉस्पिटल जवळ, नेहरूनगर, कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की, वर नमूद कैफियत व म्हणणे मधील सर्व मजकूर माझे माहितीप्रमाणे व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा

कागल

तारीख ११/१२/२०२५

R.V.Magdum

प्रतिज्ञा करणार

## ॲफिडेव्हीट

मी यातील प्रतिवादी नं. १५ रेणुका विकास मगदूम, व.व. ५८, रा. घरकाम व शेती, रा. प्लॉट नं. ३०, बी वॉर्ड, आयसोलेशन हॉस्पिटल जवळ, नेहरूनगर, कोल्हापूर देवाची शपथ घेवून खरे सांगते की, वर नमूद कैफियत व म्हणणे मधील संपूर्ण मजकूर

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

माझे माहितीप्रमाणे व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले ॲफिडेव्हीट कागल

R.V.Magdum

तारीख ११/१२/२०२५ ॲफिडेव्हीट करणार

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो.

Rahulpatil

**ॲड. राहुल आर.पाटील**

प्रतिज्ञा

मी यातील प्रतिवादी नं. १५ रेणुका विकास मगदूम, व.व. ५८, रा. घरकाम व शेती, रा. प्लॉट नं. ३०, बी वॉर्ड, आयसोलेशन हॉस्पिटल जवळ, नेहरूनगर, कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की, वर नमूद कैफियत, म्हणणे मधील व ॲफिडेव्हीटमधील सर्व मजकूर माझे माहितीप्रमाणे व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा

**कागल**

R.V.Magdum

**तारीख ११/१२/२०२५** **प्रतिज्ञा करणार**

Solemnly Affirmed before me by
Smt. Renuka Vikas Magdum
Age 58 of Neharunagar, Kolhapur who is
identified by Shri R.R.Patil Adv
............whom I know personally
Dated :- 11/12/25
Bpatil
Assistant Superintendent

(40)

Exh.22

# वकील पत्र

ॲडव्होकेटस् ॲक्ट १९६१, कलम ३४ (१) खालील मुंबई हायकोर्ट अपेलेट साईड रुल्स शेडयुल ७/१९८५ प्रमाणे मी/आम्ही महा. ॲड. वेलफेअर फंडचा सभासद नाही त्यासाठी वेलफेअर फंडाचा स्टॅम्प लावला नाही.

रे.क.नं.१६४/२०२५

## मे. दिवाणी न्यायाधीशसो, कनिष्ठ स्तर, कागल

यांचे कोर्टात..

राजश्री मंगेश रेवडे ——— वादी

विरुध्द

१५.रेणुका विकास मगदूम ——— प्रतिवादी

दावा :— हक्कज्ञापनाचा व कायम मनाईचा

मी यातील प्रतिवादी नं.१५खाली सही करणार,या लेखावरुन सदरहू दावेचे कामी माझे तर्फे हजर राहून सदर काम चालविणेस :

Order
Filed
C.J.J.D.Kagal

**ॲड.पी.बी.गुरव**
MAH/64/1984
ADV CODE- 939
पत्ता — १७६४, अ/३, ब्रम्हेश्वर रेसिडेन्सी,
उभा मारूती चौक, शिवाजी पेठ, कोल्हापूर

**ॲड.एस.आर.नलवडे**
MAH/ 2056 /2008
ADV CODE- 2135

**ॲड.राहुल आर.पाटील**
MAH/2135/2024
ADV CODE- 3309

यांना माझेतर्फे वकील नेमले आहेत या गोष्टीचे साक्षीकरीता मी माझी सही **समक्ष** आजरोजी या खाली केली आहे. ता. ११/१२/२०२५ इ. रोजी.

कबूल करुन हजर तारीख ११/१२/२०२५

R.V.Magdum

प्र.वादी नं - १५

ॲड.पी.बी.गुरव

ॲड. एस. आर. नलवडे

RahulPatil

ॲड. राहुल आर. पाटील.

Exh.23

मे. दिवाणी न्यायाधीशसो, कनिष्ठ स्तर, कागल
यांचे कोर्टात..

राजश्री मंगेश रेवडे ——— वादी

विरुध्द

१५.रेणुका विकास मगदूम ——— प्रतिवादी

Order
Seen
C.J.J.D.Kagal

यातील प्र.वादी नं.१५ यांचा पत्ता मेमो पुढीलप्रमाणे :—

| अ.नं. | नांव | पत्ता |
|---|---|---|
| १ | रेणुका विकास मगदूम | रा. प्लॉट नं.३० ,बी वॉर्ड,नेहरू नगर, आयसोलेशन हॉस्पिटल जवळ, कोल्हापूर |

येणेप्रमाणे, यातील प्रतिवादी नं.१५यांचा पत्ता मेमो असे,

कागल

ता.११./१२/२०२५

R.V.Magdum

## प्रतिज्ञा

मी यातील प्रतिवादी **रेणुका विकास मगदूम**, रा. प्लॉट नं.३०,बी वॉर्ड, नेहरू नगर, आयसोलेशन हॉस्पिटल जवळ, कोल्हापूर सत्य शपथेवर प्रतिज्ञा करते की, वर नमुद पत्ता मेमोमधील संपुर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मुाा कागल

R.V.Magdum

ता. ११/१२/२०२५